
२०२३
डॉ. सौ. गौरी राणे


'शैक्षणिक' क्षेत्रातील
उल्लेखनीय कार्याबद्दल
२०२३

# विविध क्षेत्रातील कर्तृत्ववान महिलांचा 'लोकमत सखी सन्मान' पुरस्काराने गौरव

## लोकमत सखी मंच व जैन इरिगेशन सिस्टिम्सतर्फे रंगला स्वरसंध्या सोहळा

लोकमत न्यूज नेटवर्क

जळगाव : सामान्य ते असामान्य असा प्रवास करत समाजातील इतरांसमोर आदर्श उभा करणाऱ्या विविध क्षेत्रातील कर्तृत्ववान महिलांचा शुक्रवारी, 'लोकमत सखी सन्मान' पुरस्काराने गौरव करण्यात आला. लोकमत सखी मंचतर्फे ला. ना. शाळेच्या गंधे सभागृहात या सन्मान सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते.

लोकमत सखी मंच व जैन इरिगेशन सिस्टिम्स आयोजित या कार्यक्रमाला केशव स्मृती प्रतिष्ठानचे अध्यक्ष भरत अमळकर, हेमंत बर्वे, जैन इरिगेशनचे अनिल जैन, डॉ. कल्याणी गुट्टे यांची विशेष उपस्थिती होती.

कार्यकारी संपादक रवी टाले, सहायक महाव्यवस्थापक गौरव रस्तोगी उपस्थित होते. सुरुवातीला मान्यवरांच्या हस्ते दीप प्रज्वलन व लोकमतचे संस्थापक संपादक जवाहरलाल दर्डा यांच्या प्रतिमचे पूजन करण्यात आले.

प्रास्ताविक कार्यकारी संपादक रवी टाले यांनी केले. भरत अमळकर म्हणाले, की लोकमतमध्ये आलेली बातमी सर्वस्तरापर्यंत जाते. हा विश्वास या वृत्तपत्राने जपला आहे. कधीही भडक, खोट्या बातम्या दिल्या नाहीत.

सोशल मीडियाच्या मर्यादा आहेत. त्याद्वारे क्रिएटिव्ह, पॉझिटिव्ह इमेज उभी राहिली, सकारात्मक प्रतिसाद मिळाला, असे होताना दिसत नाही. चांगल्या व्यक्तींचा सन्मान व्हावा, चांगले प्रकल्प सुरू राहावेत म्हणून वर्तमानपत्रांचे प्रयत्न असावेत.

कामाला सन्मान मिळण्यासाठी, ब्रॅण्डिंग होण्यासाठी लोकमत आयोजित आजचा पुरस्कार महत्त्वाचा आहे. समाजजीवनात सकारात्मक बदल लोकमत करू शकतो. सामाजिक दायित्व निभावण्याचा प्रयत्न म्हणजे हा पुरस्कार आहे, असेही भरत अमळकर म्हणाले. सूत्रसंचालन सरि खाचणे यांनी केले.



लोकमत सखी सन्मान' सोहळ्यात पुरस्कारार्थी महिलांसमवेत अनिल जोशी, नीलेश निरगुडकर, भरत अमळकर, डॉ. कल्याणी गुट्टे, हेमंत बर्वे, पल्लवी केळकर आदी.



लोकमत सखी मंचतर्फे व जैन इरिगेशन सिस्टिम्सच्या सहकार्याने आयोजित 'लोकमत सखी सन्मान' सोहळ्यात स्वर संध्या कार्यक्रम सादर करताना कलाकार.

### असे आहेत पुरस्कारार्थी

पुरस्कार्थी प्राचार्य डॉ. गौरी राणे (शिक्षण), डॉ. सई नेमाडे (वैद्यकीय), प्रिया सफळे (सांस्कृतिक), सुधा काबरा (सामाजिक), छाया तायडे (क्रीडा), विमल भिल (शौर्य) यांच्यासह विशेष योगदानासाठी इंदिराताई पाटील (चोपडा) यांना जीवन गौरव पुरस्कार देऊन मान्यवरांच्या हस्ते सन्मानित करण्यात आले. विमल भिल यांनी महिला वैमानिकाचा जीव कसा वाचविला याची आठवण खास अहिराणी भाषेतून सांगितली. उपस्थितांनी त्यांच्या हिमतीला, दुर्घटनेच्या दिवशी दाखविलेल्या समयसूचकतेला टाळ्यांच्या गजरात सलाम केला.

### हिंदी व मराठी गीतांची रंगली मैफल

कार्यक्रमप्रसंगी स्वर संध्या हा हिंदी-मराठी गीतांचा कार्यक्रम पार पडला. जळगावकर रसिक श्रोत्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. पाऊस गीते, प्रेम गीते यांना भरभरून दाद मिळाली. अभिनेता, कवी हेमंत बर्वे, नीलेश निरगुडकर, पल्लवी केळकर यांनी गीते सादर केली. साथसंगत तबला/ऑक्टोपॅडवर श्रीकांत राहीलकर, साइड रिदम व्यंकटेश कुलकर्णी, की बोर्डवर मिलिंद परांजपे यांची होती.


लोकमत
लोकमत सखी मंच
आयोजित
तुमच्या कर्तृत्वाला
जैन इरिगेशन सिस्टीम्स लि.
लोकमत
लोकमत सखी मंच